थोडक्यात...

ऑटोरिक्षा व मीटर टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळ विविध योजनांच्या लाभासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

परभणी - महाराष्ट्र शासनामार्फत प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रानुसार व आवश्यकतेनुसार जिल्हास्तरीय धर्मवीर आनंद दिघेसाहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सदर मंडळाकडून केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना जिवन विमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्य विषय लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसहाय्य योजना (रु.५० हजारांपर्यंत), पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्य वृध्दी योजना, ६५ वर्षावरील ऑटोरिक्षा / मिटर्ड टॅक्सी परवानाधारक यांना निवृत्ती सन्मान योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदान, नविन ऑटो रिक्षा /मिटर्ड टॅक्सी खरेदी, गृह खरेदीसाठी घेण्यात येणारे कर्ज, राज्यस्तरीय मंडळाने मान्यता दिलेल्या इतर कल्याणकारी योजना तसेच शासनाने निर्देशित केलेल्या इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार आहे. या योजनांच्या लाभासाठी ऑटोरिक्षा/ मिटर्ड टॅक्सी परवानाधारक यांना सदर मंडळाचा सभासद होणे आवश्यक आहे. सभासद नोंदणी https://ananddighekalyankarimandal.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सभासद नोंदणी शुल्क ५००/- व प्रति वर्ष वार्षिक सभासद शुल्क ३००/- भरणा करणे आवश्यक आहे, अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष पाराशर यांनी कळविली आहे.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प अंतर्गत महिला गटांना ५ एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

परभणी - नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा-२) अंतर्गत जिल्ह्यातील प्रकल्प गावातील नोंदणीकृत महिला शेतकरी गट यांच्या मार्फत गावस्तरावर 'कृषी अवजारे बँक' स्थापन करुन भाडेतत्वावर यंत्रसामग्री उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. प्रकल्पांतर्गत 'एक गाव-एक कृषी अवजारे बँक' या संकल्पनेनुसार तालुकानिहाय लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. सदर योजनेसाठी एफपीओ-डीबीटी (https://dbt-ndksp-agribusiness.mahapocra.in/) पोर्टलवर अर्ज प्रक्रिया सुरू असून ५ एप्रिल २०२६ ही अर्जाची अंतिम तारीख आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी किंवा सहाय्यक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) दौलत सुदाम चव्हाण यांनी केले आहे. प्रकल्प गावांतील एमएसआरएलएम (उमेद) व माविम पुरस्कृत महिला बचत गट आणि महिला गाव संघ व नोंदणीकृत महिला शेतकरी गट अर्जासाठी पात्र ठरणार आहेत. एका गावातून एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास निवड प्रक्रिया ऑनलाईन लॉटरीद्वारे केली जाणार आहे. महिला शेतकरी केवळ शेतीपुरत्या मर्यादित न राहता यंत्रसामग्री व्यवस्थापन व सेवा क्षेत्रातही पुढे याव्यात, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यामुळे महिला गटांना उत्पन्नाचे नवे साधन उपलब्ध होईल, तसेच शेतकऱ्यांना वेळेवर कृषी अवजारे मिळण्यास मदत होईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) दौलत सुदाम चव्हाण यांनी सांगितले.

अन्नसुरक्षा योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा -राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे

परभणी- राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आढावा बैठकीत, रेशन वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलावीत, असे निर्देश देण्यात आले. समाजातील वंचित घटक, ऊसतोड कामगार आणि वीटभट्टी मजुरांना प्राधान्याने अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मिळवून देण्याचे निर्देश देण्यात आले. वंचित घटकांना रेशनकार्डचा लाभ मिळावा यासाठी सिग्नल आणि मंदिर परिसरात भिक्षा मागणाऱ्या व्यक्तींचा तातडीने सर्वे करून पात्र व्यक्तींना रेशनकार्ड उपलब्ध करून द्यावे.

तसेच, प्रलंबित असलेल्या सर्व रेशनकार्डांचे वाटप पुढील तीन दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश सर्व निरीक्षण अधिकाऱ्यांना बैठकीमध्ये देण्यात आले. ऊसतोड कामगार, वीटभट्टी मजूर आणि शेतमजुरांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभ वेळेवर मिळतो की नाही, याबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी खातरजमा करावी. यामध्ये कसूर आढळल्यास संबंधित यंत्रणेवर कडक कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. अन्नसुरक्षा योजनेपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही यासाठी जुन्या लाभधारकांची उत्पन्न पडताळणी करून पात्र शिधापत्रिका योजनेत ठेवण्याबाबत तसेच नव्याने पात्र लाभार्थी निवडण्याबाबत निर्देश श्री. ढवळे यांनी दिले. लोकसंख्येनुसार आवश्यक त्या ठिकाणी नवीन रास्तभाव दुकाने सुरू करावयाची असल्यास त्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करून लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात नवीन रास्तभाव दुकाने मंजूर करण्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. तसेच स्वस्त धान्य दुकानांना नियमित भेटी देऊन लाभार्थ्यांना धान्याचा लाभ व्यवस्थितरित्या देण्यात येत असल्याची खात्री करण्यात यावी. रास्तभाव दुकानांत दरमहा 'अन्न दिन' साजरा करून त्या माध्यमातून तळागाळातील नागरिकांपर्यंत धान्याच्या लाभाबाबत जनजागृती करावी, अशा सूचना राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष श्री. ढवळे यांनी बैठकीमध्ये दिल्या. बैठकीच्या समाप्तीनंतर तालुका परभणी अंतर्गत पात्र दिव्यांग व वंचित घटकांतील महिला लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण देखील करण्यात आले.

'शेक हॅण्ड' संस्थेमार्फत निराधार ताईंना पिको फॉल मशीनची भेट : रमजान ईद निमित्त स्तुत्य उपक्रम

परभणी- रमजान ईदच्या पवित्र सणाचे औचित्य साधत 'शेक हॅण्ड' संस्थेमार्फत सय्यद नाजेमा सय्यद बाबामियां यांना २१ मार्च रोजी भोगाव साबळे येथे आयोजित कार्यक्रमात पिको फॉल मशीनची भेट देण्यात येणार आहे. सय्यद नाजेमा यांच्या पतीचे काही वर्षांपूर्वी दुर्धर आजाराने निधन झाले असून त्यानंतर कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे. त्या आपल्या तीन अपत्यांचा सांभाळ करत असून मुलगा दहावीमध्ये शिक्षण घेत आहे, तर दोन मुली अनुक्रमे सहावी व आठवीत शिकत आहेत. नाजेमा यांना शिलाईकामाचे कौशल्य असल्याने त्यांना पिको फॉल मशीन देऊन त्यांच्या उदरनिर्वाहाला हातभार लावण्याचा प्रयत्न 'शेक हॅण्ड' संस्थेमार्फत करण्यात येत आहे. सणासुदीच्या तसेच महापुरुषांच्या जयंतीनिमित्त अशा प्रकारचे उपक्रम राबवून गरजू महिलांना स्वावलंबी बनविण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

डासांचा उपद्रव वाढला

परभणी – शहरात मोठ्या प्रमाणावर डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे तापासारखे आजार बळावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डासांचा बंदोबस्त करण्यासाठी महानगरपालिकेने धूर फवारणी करावी, वाढत्या डासांमुळे लहान मुलांना डेंग्यु मलेरीया सारख्या अजारांचा सामना करावा लागत आहे तर उन्हाळ्याच्या दिवसात पडणाऱ्या पासामुळे साचलेल्या पाण्यापासुन डासांची निर्मिती होऊ शकते यावर काहीतरी प्रशासनाने उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

पालिकेच्या बी विभागात महिलां कर्मचाऱ्यांसाठी सायबर जनजागृती सत्र संपन्न

(दिनेश मराठे/दै.धर्मयोध्दा)

मुंबई – महानगर पालिकेच्या बी विभाग प्रांगणातील सभागृहात डिजिटल फसवणूकीपासून बचाव आणि सुरक्षा संदर्भात विभागातील आस्थापनेवरील कर्मचारी संवर्गास सायबर गुन्हे व वर्तणूक या विषयी अत्यंत महत्वाचे जनजागृती सत्र सोमवारी साहाय्यक आयुक्त योगेश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.हे बी विभाग कार्यालयातील का.म.लें.अ.प्र.प्रमुख अंतर्गत तक्रार समिती व सावित्रीबाई फुले स्त्री संसाधन केंद्र व सायबर वेलनेस सेंटर यांच्या संयुक्त विद्यामाने सकाळी ११ ते १ वाजता या वेळेत सायबर जनजागृती या विषयी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.यावेळी पालिका कर्मचारी व अधिकारी यांनी उपस्थित राहून सत्राचा लाभ घेतला.

सायबर वेलनेस सेंटरतर्फे दोन्ही प्रशिक्षक व समुपदेशक ओवी भालेराव आणि रीम शेख ह्या महिला अधिकारी यांनी उपस्थितांना सायबर सुरक्षा आणि जनजागृतीचे महत्व विशद केले.प्रशासकीय अधिकारी कविता डोके यांनी या शिबिरात जास्तीत जास्त कर्मचारीवर्गाने उपस्थित राहावे म्हणून विशेष काळजी घेतली.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना सुरक्षित डिजिटल वातावरण देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.आमच्या विभागातील कार्यालयीन महिलांना सायबर गुन्ह्यांपासून वाचवण्यासाठी डिजिटल सुरक्षा, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि ऑनलाइन फसवणुकीविषयी जनजागृती होण्यासाठी या शिबिर सत्राचा फारच उत्तम उपयोग होईल.असे बी विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश देसाई यांनी यावेळी म्हटले.

पाथरी येथील रोजगार मेळाव्यास उमेदवारांचा उस्फूर्त प्रतिसाद

(मुरलीधर गोगे/दै.धर्मयोध्दा)

पाथरी- परभणी जिल्हयातील गरजू सुशिक्षित बेरोजगारांना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी संचलित शांताबाई नखाते विद्यालय, पाथरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७/०३/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता शांताबाई नखाते विद्यालय, शिवाजी नगर, पाथरी येथे ''पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'' आयोजीत करण्यात आलेला होता. जिल्हयातील दहावी, बारावी, आयटीआय, डीप्लोमा, पदवी इत्यादी शैक्षणीक पात्रता धारक उमेदवारांसाठी ट्रेनी ऑपरेटर, क्षेत्र अधिकारी (SFO), क्षेत्र अधिकारी (RO), विमा सल्लागार, विमा सखी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी (CMYKPY) इत्यादी २०० पदांसाठी मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. या मेळाव्यास १३० उमेदवार उपस्थितीत होते त्यापैकी ७४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री अनिल नखाते, वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी, प्रमुख मार्गदर्शक श्री प्र.सो. खंदारे, सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता परभणी, प्रमुख पाहुणे श्री आर.एम.टेंगसे प्रशासकीय अधिकारी वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणी, व श्री सि.एस.उस्तुरगे शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था पाथरी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राध्यापक श्री किशन डहाळे सर यांनी केले. रोजगार मेळावा यशस्वी होण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातील श्री प्रविण रुद्रकंठवार श्री राहूल गजभारे, श्री सचिन चव्हाण, श्री राहूल काळे, श्री करिमोदीन अन्सारी यांनी सहकार्य केले.

परभणीत २८ व २९ मार्च रोजी 'अमृतपेठ थेट बाजारपेठ' प्रदर्शन वस्तु, कपडे, खाद्यपदार्थ, ज्वेलरी, कलात्मक वस्तु खरेदीची संधी

परभणी- 'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून दि. २८ व २९ मार्च रोजी सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत जागृती मंगल कार्यालय, वसमत रोड, परभणी येथे 'अमृतपेठ थेट बाजारपेठ' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक उत्पादक, लघुउद्योजक व विक्रेत्यांना त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी भव्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे. प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या वस्तू, स्वादिष्ट खाद्यपदार्थ, कपडे, घरगुती साहित्य, कलात्मक वस्तू, ज्वेलरी आदी उत्पादनांचे आकर्षक स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देणे, स्थानिक उद्योजकांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि नागरिकांना दर्जेदार व विश्वासार्ह उत्पादने एकाच ठिकाणी मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे नागरिकांनी कुटुंबासह या प्रदर्शनाला भेट देऊन खरेदीचा आनंद घ्यावा तसेच लघुउद्योजकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक अनिरुद्ध काटे यांनी केले आहे. महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था असून, खुल्या प्रवर्गातील अशा जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना लाभ देण्याचे काम करते, ज्यांना इतर शासकीय संस्था किंवा महामंडळांचा लाभ मिळत नाही. अशा जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक हा अमृत संस्थेचा लक्षीत गट आहे. त्यामध्ये ब्राम्हण, कोमटी, मारवाडी, ठाकूर,गुजराती, सिंधी, कायस्थ,जाट, बणिया, बंत्स, नायर अय्यंगार, पाटीदार, बंगाली, पटेल, येलमार, त्यागी, सेनगुनथर, राजपुरोहित, नायडू, एलमार इत्यादींचा समावेश आहे. अशा जातींमधील वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या व्यक्तींना अमृत संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेता येतो. अधिक माहितीसाठी अमृत जिल्हा कार्यालय, जुनी प्रशासकीय इमारत, पहिला मजला, बीएसएनएल कार्यालयाच्या बाजूला, परभणी येथे संपर्क साधावा, असे आवाहन श्री. काटे यांनी केले आहे.

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रात गुढी पाडव्यानिमित्त भव्य बाईक रॅली तसेच गुढीची उभारणी-खासदार रविंद्र वायकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन

(दिनेश मराठे/दै.धर्मयोध्दा)

मुंबई- हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी साजऱ्या होणाऱ्या गुढी पाडव्याच्या निमित्ताने मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्रात भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. श्याम नगर तलाव येथे भव्य गुढी हि उभारण्यात येणार आहे. यावेळी परिसरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

गुढी पाडव्याच्या दिवशी इच्छापूर्ती गणेश मंदिर, श्याम नगर तलाव येथे उभारण्यात येणाऱ्या भव्य गुढीचे सकाळी १० वाजता खासदार वायकर यांच्या हस्ते पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर पारंपरिक वेशभूषेत महिलां, पुरुष तसेच तरुण सहभागी होणार असून लेझीमच्या तालावर तसेच ढोल-ताशांच्या गजरात आकर्षक मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत सहभागी होणाऱ्याकडून नृत्य हि सादर करण्यात येणार असून सर्वोत्तम वेशभूषा करून येणाऱ्याना आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. तसेच अनेक स्पॉट बक्षिसे हि देण्यात येणार आहे.

गुढी पूजनेनंतर भव्य बाईक रली काढण्यात येणार असून यात लोकसभा क्षेत्रा अंतर्गत येणार विविध विधानसभा क्षेत्रातील मिळून सुमारे १०० बाईकस्वार रॅलीमध्ये सहभागी होणार आहेत. हि रॅली महाकाली गुंफा, बिंद्र कॉम्प्लेस, तक्षिला, मॉडेल टाऊन, पीएमजीपी म्हाडा सर्वोदय नगर, मेघवाडी पोलीस स्टेशन, स्वामी विवेकानंद स्कूल, मेघवाडी नाका, प्रेमनगर, समर्थ नगर, ठाकूर नगर, महाराज भुवन, धोबी घाट, जोगेश्वरी स्टेशन, सदभक्ती मंदिर, सुभाष नगर, बांद्रेकर वाडी, जेव्हीएलआर, प्रतापनगर, रामवाडी, श्यामनगर पेट्रोल पंप, ओबेरॉय स्कूल, दुर्गानगर, मातोश्री कमाल अमरोही स्टुडीओ, एमएमआरडीए कॉलोनी, पूनम नगर, नमस्कार, ग्रीनफिल्ड, कल्पतरू करून इच्छापूर्ती गणेश तलाव येथे या रॅलीची समाप्ती होणार आहे. सकाळी १०.३० वाजता या रॅलीला सुरुवात होणार आहे. या रॅलीच्या माध्यमातून समाजातील एकोपा व सांस्कृतिक परंपरा जपण्याचा संदेश देण्यात येणार असल्याचे, आयोजक मनीषा वायकर व दीप्ती वायकर पोतनीस यांनी सांगितले.

जि प प्रशाला कौसडी शाळेत पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न

(संतोष तायडे/दै.धर्मयोध्दा)

बोरी - कौसडी केंद्रातील जि प प्रशाला कौसडी ता.जिंतूर जि.परभणी शाळेमध्ये २६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध शालेय स्तरावर सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.सांघिक स्पर्धेमध्ये खो-खो,कबड्डी,लंगडी,क्रिकेट या स्पर्धा सांघिक स्वरूपामध्ये घेण्यात आल्या होत्या त्याचबरोबर वैयक्तिक स्वरूपामध्ये प्रत्येक वर्ग ५ ते १० वी वर्गानुसार विविध क्रीडा स्पर्धा जसे की संगीत खुर्ची,लांब उडी,उंच उडी दोरीवरच्या उड्या,लिंबू चमचा, चित्रकला स्पर्धा,सुंदर हस्ताक्षर स्पर्धा,रांगोळी स्पर्धा,गोळा फेक इत्यादी स्पर्धा या घेण्यात आल्या होत्या या सर्व स्पर्धेमध्ये प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध

स्पर्धा त्याचबरोबर राष्ट्रीय आर्थिक दुबल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ शाळेमध्ये दि.१७ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.राधेश्याम वाढवे मुख्याध्यापक जि प प्रशाला कौसडी तर प्रमुख पाहुणे मुजाहिद कादरी जिंतूर पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी,ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर बारवकर,प्रतिष्ठित नागरिक श्री.माधवराव खरात,अनवर बेग,योगेश काकडे,इम्रान शेख त्याचबरोबर शालेय व्यवस्थापन समिती जि प प्रशाला कौसडी अध्यक्ष श्री रमेशराव बारवकर,उपाध्यक्ष अकबर बेग, सदस्य श्री.गजानन लगड,नितिन हराळे,सुनिल कसाबकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते स्त्री शिक्षणाची जननी माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली त्यानंतर सर्व यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विविध शालेय उपयोगी साहित्य पारितोषिक स्वरूपात देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सौ.सुनिता गांजरे,श्री गजानन पांचाळ,श्री.गोविंद व्यवहारे सौ.सुशीला नवले,सौ मीरा कुंभारे,सौ वंदना रेवतकर,श्री.अभिजित मोरे,श्री.गणेश काळे,श्री.मनोज भालेराव,श्री.ज्ञानेश्वर बर्वे,श्री कुंडलिक राठोड,श्री.दशरथ भिसे,हजरा शेख व उषा शेळके मावशी या सर्वांनी अथक परिश्रम घेऊन यशस्वीपणे कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

करिअर कट्टा उपक्रमांतर्गत प्रा. डॉ. मारोती खेडेकर यांना 'उत्कृष्ट तालुका समन्वयक' द्वितीय क्रमांकाचा मान

(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)

पाथरी- महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ''करिअर कट्टा'' उपक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समन्वयकांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये स्व. नितीन महाविद्यालय, पाथरी येथील प्रा. डॉ. मारोती उत्तमराव खेडेकर यांना ''उत्कृष्ट तालुका समन्वयक द्वितीय क्रमांक'' हा पुरस्कार दि. १६ मार्च २०२६ रोजी, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर येथे आयोजित कार्यक्रमात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे पाथरी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली असून, करिअर मार्गदर्शनाच्या क्षेत्रात प्रा. खेडेकर यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतली गेली आहे. पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर संस्थेचे अध्यक्ष मा. हरिभाऊ (काका) लहाने, सचिव कुणाल (भाऊ) लहाने, प्राचार्य डॉ. राम फुन्ने, उपप्राचार्य डॉ. सुरेश सामाले, डॉ. रंजित गायके, डॉ. हरि काळे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यांनी प्रा. खेडेकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये करिअर कट्टा उपक्रमाबद्दल अधिक प्रेरणा निर्माण होणार असून, भविष्यातही अशाच प्रकारे मार्गदर्शनाचे कार्य अधिक प्रभावीपणे सुरू राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao